# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्रमांक/सामान्य/कक्ष-१/टे-३/आस्थापना/तलाठी भरती/१२/२०१९
दि.१०/१२/२०१९

प्रति,

सोबत जोडलेल्या यादीनुसार

अॅप्लिकेशन क्र. –

प्रवर्ग -

**विषय : तलाठी पदभरती २०१९**
**कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहणेबाबत.**

जिल्हाधिकारी ठाणे यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी (गट-क) संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने www. mahapriksha.gov.in या संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक 02 जुलै 2019 ते दिनांक 26 जुलै 2019 या कालावधीत महापरिक्षा पोर्टलमार्फत ऑनलाईन परिक्षा घेण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील पत्र क्र. तलाठी-2017/प्र.क्र.-461/ई-10 दिनांक 18 सप्टेंबर 2019 अन्वये निकालाच्या प्राप्त गुणांच्या आधारे गुणतवत्तेनुसार, सामाजिक व समांतर आरक्षण, भरती प्रकीयेसंबंधी शासन निर्णयासह व याबाबतच्या सर्व प्रचलित नियम/निदेश/परिपत्रके/सुचना इ. विचारात घेता महापरीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उत्तीर्ण होऊन कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची **यादी** या कार्यालयाच्या www.thane.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून सदर यादीत आपले नांव समाविष्ट आहे.

सदर कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी **दिनांक १८/१२/२०१९ रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे** येथे करण्यात येणार आहे.

प्रस्तुत कामी आपणास कळविणेत येते की, आपण खालील नमुद केलेप्रमाणे सर्व मुळ कागदपत्र/प्रमाणपत्र त्यांच्या साक्षांकीत छायाप्रतींच्या 2 संचांसह उक्त नमुद केलेल्या ठिकाणी व वेळी स्वखर्चाने न चुकता उपस्थित रहावे. आपण विहीत वेळी उपस्थित न राहिल्यास आपणास सदरील तलाठी पदभरती प्रकरणी स्वारस्य नसल्याचे गृहित धरुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.